पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

मा.महिला व बालकल्याण समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १८**

सभावृत्तांत

दिनांक - **१४/१०/२०२१** वेळ - दुपारी **२.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची **पाक्षिक** सभा **गुरुवार** दिनांक **१४/१०/२०२१** रोजी दुपारी **२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती यांचे दालनात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि. ०३ जुलै २०२० व २८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे काही सन्मा.सदस्य सभागृहात तर काही सन्मा.सदस्य ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित होते.

१. **मा.लोखंडे चंदा राजू - सभापती**
२. सविता बाळकृष्ण खुळे
३. मा.राजापुरे माधवी राजेंद्र
४. मा.गायकवाड निर्मला मनोज
५. मा.कदम निकीता अर्जुन
६. अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.अजय चारठाणकर, मा.सुहास बहाद्दरपुरे - समाज विकास अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.१) महानगरपालिकेच्या बालवाडी वर्गातील मुलांकरिता साहित्य पुरविणे बाबत.
मा.सविता खुळे व मा.माधवी राजापुरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) आत्मिक शक्ती वृद्धीगत करुन जनमाणसात नवचैतन्य जागृत करणारा जागर स्त्री शक्तीचा हा आगळावेगळा उपक्रम राबविणेबाबत.
मा.सविता खुळे व मा.माधवी राजापुरे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक २३/०९/२०२१ रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्र. १७**) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ४९ विषय क्रमांक - ०१
दिनांक - १४/१०/२०२१
सुचक - मा.सविता खुळे अनुमोदक - मा.माधवी राजापुरे
संदर्भ - मा.सविता खुळे व मा.माधवी राजापुरे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिला व बालकल्याण योजने अंतर्गत विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. यामध्ये पिंपरी चिंचवड शहरात पिं.चिं.मनपा मार्फत लहान मुलांकरिता बालवाडी वर्ग चालविले जातात. बालवाडी वर्गात शिकत असलेल्या लहान विद्यार्थ्यांना खेळण्या करिता खेळणी पुरविणे आवश्यक आहे. तरी “यश एंटरप्रायझेस” ह्या अनुभवी संस्थेमार्फत बालवाडी वर्गातील लहान विद्यार्थ्यांकरिता खेळणी पुरविणेकामी मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सदर ठराव कायम होण्याची वाट न पाहता वित्तीय मान्यता देणकामी मा.स्थायी समिती सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५०　　　　　　　　　　　　　　　　　　विषय क्रमांक - ०२

दिनांक - १४/१०/२०२१

सुचक - मा.सविता खुळे　　　　　　　　　　　　　　　अनुमोदक - मा.माधवी राजापुरे

संदर्भ - मा.सविता खुळे व मा.माधवी राजापुरे यांचा प्रस्ताव.

आत्मिक शक्ती वृद्धिगत करुन जनमाणसात नवचैतन्य जागृत करणारा जागर स्त्री शक्तीचा सर्वांगिण विकास, तणावमुक्ती व सृजनशीलतेला वाव देण्यासाठी आपल्या मार्फत व आपल्या आखत्यारित न्यासा ह्युमन डेव्हलपमेंट आणि रिसर्च सेंटरने उपक्रम हाती घेण्याची इच्छा दर्शविली आहे. खालील विषयी आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या म्युझिक हिलर, सक्सेस कोच, आय.टी. उद्योजिका साधना योगलक्ष्मीजी या प्रशिक्षण देणार आहेत. त्या वरिल संस्थेच्या संस्थापिका आहेत.

| अ.क्र. | तपशील | मानधन |
|---|---|---|
| १. | "जागर स्त्री शक्तीचा" कार्यक्रम<br>१) स्वच्छता जागृती व आंतरिक संतुलन (वेळ १ तास ३० मिनीट)<br>२) तणावमुक्ती (वेळ ३० मिनीट)<br>३) ध्येय निश्चिती (वेळ ३० मिनीट)<br>४) आत्मनिर्भरता (वेळ ३० मिनीट)<br>५) संगीत साधना (वेळ १ तास)<br>(अर्धा तासाचा ब्रेक असेल) | एकूण ८ कार्यक्रमा करिता ५,६६,०००/- × ८ = ४५,२८,०००/- (सर्व करांसहित) |
| | एका कार्यक्रमासाठी सभागृहाचा खर्च, गण्य व्यक्तींचा येण्या-जाण्याचा खर्च, मान्यवरांचे मानधन, प्रवास खर्च, साऊंड इंजिनिअर साऊंड सिस्टीम, ३ म्युजिशियन, आयोजक आणि स्वयंमसेवक. यांचा खर्च असे प्रत्येक कार्यक्रमाकरिता र.रु.५,६६,०००/- (सर्व करांसहित) लागणार आहेत. | |

खालील प्रमाणे -

१) दिव्यांग / शेतकरी कुटुंब तणावमुक्ती

२) किशोरवयीन मुली / महिलांना संगीतातून समूपदेशन

३) मुलींची तांत्रिक / व्यावसायिक कौशल्यवृद्धी

४) ग्रामीण भागातील मुलींचे स्वसंरक्षण, आत्मसन्मान व मनोबल वाढविणे.

यासाठी जागर शक्तीचा हा कार्यक्रम आपल्या मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ८ प्रभागांमध्ये (एकुण ८ कार्यक्रम) आयोजित करणेकामी मान्यता

देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सदर ठराव कायम होणेची वाट न पाहता मा.स्थायी समिती सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( लोखंडे चंदा राजू )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/०४/कावि/४८६/२०२१
दिनांक : १८/१०/२०२१



( उल्हास बबनराव जगताप )
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.